# रात्रशाळेचा प्रयोग यशस्वी

## 'मटा'च्या माध्यमातून 'मासूम' संस्थेचा पुढाकार

म. टा. प्रतिनिधी, मुंबई




शिक्षण प्रवाहापासून बाहेर पडलेल्या असंख्य विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरलेल्या रात्रशाळांनी देखील करोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन शिक्षणाचा मार्ग स्वीकारला होता. तसेच यंदा दहावीची नोंदणी केलेल्या एक हजार २५० विद्यार्थ्यांपैकी चारशेहून अधिक विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन नसल्यामुळे या वर्गांना उपस्थिती दर्शवू शकत नाहीत. हे लक्षात येताच 'मटा'च्या माध्यमातून दानवीरांनी पुढे येण्याचे आवाहन रात्रशाळांचे व्यवस्थापन पाहणाऱ्या मासूम संस्थेने केले होते. या आवाहनाला वाचकांचा प्रतिसाद म्हणून ४०० विद्यार्थ्यांना मोबाइल मिळाले आहेत. मात्र, हा उपक्रम राज्यातील इतर भागातील रात्रशाळांमध्ये राबवण्याचा निर्णय घेतला असून आणखी ४०० मोबाइल मिळवण्याचे प्रयत्न त्यांनी सुरू केले आहेत.


रात्रशाळांमध्येही ऑनलाइन वर्ग

सरकार, समाज, शिक्षणक्षेत्रापासून काही अंशी दुर्लक्षित असलेल्या रात्रशाळांतील विद्यार्थ्यांना खासगी शाळांप्रमाणे सुविधा देण्याच्या मुंबईतील 'मासूम' या स्वयंसेवी संस्थेकडे जवळपास ऐंशीहून अधिक रात्रशाळांचे पालकत्व आहे. दिवसभर नोकरी करुन रात्री शिक्षण घेण्यासाठी धडपड करणाऱ्या या होतकरू विद्यार्थ्यांना आपले यंदाचे वर्ष करोनामुळे वाया जाणार ही वाटलेली भीती मासूम संस्थेच्या 'ऑनलाइन' पुढाकारामुळे दूर झाली आहे. या उपक्रमाचा शिक्षण विभागाकडून कौतुक करण्यात आले आहे. या ऑनलाइन वर्गांना उत्तम प्रतिसाद मिळत असून सुरुवातीला हा प्रयोग यशस्वी होईल का याबाबत असलेली साशंकता मिटली असल्याची माहिती संस्थेने दिली.

विशेष म्हणजे, संस्थेने विद्यार्थ्यांची आवड जपण्यासाठी सिंगापूरस्थित 'सॉल्व एज्युकेशन' संस्थेच्या मदतीने अभ्यासक्रमाचे 'गेमिफिकेशन' (ऑनलाइन खेळ, किंवा ग्राफिक्समध्ये रुपांतर) करुन घेतले जात आहे. यामुळे एक मॉडेल तयार होत असून एखाद्या अनुपस्थित विद्यार्थ्याला मागावून, एखादा भाग शिकता येणार आहे.

### आठवी, नववीचेही वर्ग सुरू होणार

एकीकडे नियमित विद्यार्थ्यांच्या शाळा बंद असताना मुंबईतील रात्रशाळांमधील विद्यार्थी आपला अभ्यासक्रम पूर्ण करताना दिसत आहेत. या उपक्रमामुळे भविष्यात रात्रशाळांचे संचलन पूर्णतः ऑनलाइन होण्याची सकारात्मक चिन्हे दिसू लागली आहेत. हाच उपक्रम आता मुंबईव्यतिरिक्त राज्यातील इतर भागातील रात्रशाळांमध्ये राबवता येत आहेत का याची चाचपणी केली जात आहे. तर दहावीसोबत आठवी, नववी इयत्तेच्या विद्यार्थ्यांचे वर्ग सुरू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. त्यासाठी अतिरिक्त ४०० मोबाइल लागणार असल्याचे प्राथमिक अहवालात पुढे आले आहे. दानवीरांनी पुन्हा एकदा दान करून मुलांचे स्वप्नाला हातभार लावावा असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे. संपर्क : रामदास ९९६७१३३००१

### व्यासपीठ निर्माण करणार

मासूम संस्था लवकरच पोर्टल तयार करण्याच्या विचारात आहे. जेणेकरून राज्यभरातील रात्रशाळांच्या विद्यार्थ्यांना कुठल्याही कानाकोपऱ्यातून आपले प्रश्न मांडण्याची, शंका विचारण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळणार आहे. तसेच याठिकाणी हेल्पलाइन नंबर उपलब्ध करून दिला जाणार आहे. याठिकाणी याबाबत शिक्षण विभागासोबत सकारात्मक चर्चा सुरू असल्याचे कळते आहे.

“ या उपक्रमाची व्याप्ती वाढविण्याचे नियोजन सुरु असून यासाठी अतिरिक्त ४०० मोबाइलची गरज भासणार आहे. हे मोबाइल केवळ गरजू विद्यार्थ्यांना मिळतील याची पूर्ण काळजी संस्थेकडून घेतली जात आहे. ऑनलाइन शिक्षणामुळे रात्रशाळांमधील विद्यार्थ्यांना नवा आशेचा किरण दिसू लागला आहे. विद्यार्थ्यांशी शिकण्याची इच्छा वाढू लागली आहे.

– निकिता केतकर,
मासूम संस्थेच्या प्रमुख

शैलेश जाधव

